# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

## दिनांकः04.06.2024 वारःमंगळवार

---

1. लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीला सुरुवात. आतापर्यंत हाती आलेल्या कलांनुसार एनडीए 209 जागांवर आघाडीवर
2. यंदा एकंदर 64 कोटी 20 लाख मतदारांच्या सहभागासह भारतानं नोंदवला जागतिक विक्रम
3. क्लाउडिया शेईनबाऊम ठरल्या मेक्सिकोच्या पहिल्या महिला अध्यक्ष
4. फळांचा शंभर टक्के वापर असल्याचा उल्लेख जाहिराती आणि उत्पादनांच्या लेबलवरून काढून टाकण्याचे अन्न पदार्थ व्यावसायिकांना निर्देश आणि
5. आसाममधील पूरस्थिती कायम, 10 जिल्ह्यांतील 6 लाखांहून अधिक लोकांना पुराचा तडाखा

**<u>मतमोजणी</u>**

लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीला आठ वाजल्यापासून सुरुवात झाली असून सुरुवातीला टपाली मतांची मोजणी करण्यात येत आहे. आता मतमोजणीचे प्राथमिक कल हाती येण्यास सुरुवात झाली आहे. आतापर्यंत 366 मतदारसंघातले कल जाहीर झाले असून एनडीए 206 तर इंडिया 147 जागांवर आघाडीवर आहे. 13 मतदारसंघात अन्य पक्षांनी आघाडी मिळवली आहे. रायगडमधून अनंत गिते, कोल्हापूरमधून शाहू महाराज, बुलढाणा इथं प्रतापराव जाधव, बीडमध्ये बजरंग सोनवणे, ठाणे इथून नरेश म्हस्के यांनी आघाडी घेतली आहे.
आहे.

**<u>विश्वविक्रम</u>**

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत एकंदर 64 कोटी 20 लाख मतदारांनी मतदानात सहभाग घेतला, यामुळं भारतानं मतदानाचा जागतिक विक्रम प्रस्थापित केला असल्याची माहिती मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली. मतदारांची ही संख्या G7 गटातील अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान आणि कॅनडा या सर्व सात देशांमधील मतदारसंख्येच्या एकत्रित बेरजेच्या दीड पट असल्याचं राजीव कुमार यांनी नमूद केलं. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत 31 कोटी 20 लाख महिलांनी मतदानाचा हक्क बजावला, ही देखील जगातील सर्वाधिक संख्या असल्याचं त्यांनी नमूद केलं. देशात यावेळी केवळ 39 केंद्रांवर फेरमतदान घेण्यात आलं. निवडणूक आयोगाकडे आलेल्या आदर्श आचार संहिता भंगाच्या 495 तक्रारींपैकी 90 टक्के तक्रारींचा निपटारा करण्यात आल्याचंही राजीव कुमार यांनी यावेळी सांगितलं.

**<u>पुस्तकालय</u>**

राष्ट्रीय ई-पुस्तकालय या डिजिटल वाचनालय व्यासपीठाची संस्थात्मक रुपरेषा आखण्यासंदर्भात केंद्रीय शालेय शिक्षण विभागानं नॅशनल बुक ट्रस्टशी काल नवी दिल्लीत सामंजस्य करार केला. वाचक कुठल्याही भौगोलिक प्रदेशात असला तरी त्यांना राष्ट्रीय ई-पुस्तकालयाच्या माध्यमातून वाचनासाठी 24 तास पुस्तकं उपलब्ध होणार असल्याचं उच्च शिक्षण विभागाचे सचिव के. संजय मूर्ती यांनी यावेळी सांगितलं. अनेक राज्यांमध्ये शेवटच्या घटकांपर्यंत वाचनालयाची सोय उपलब्ध नसल्याच्या समस्येचंही राष्ट्रीय ई-पुस्तकालयाच्या माध्यमातून निराकरण होणार आहे. तसंच येत्या 2 ते 3 वर्षात शंभरहून अधिक भाषांमधली 10 हजारांपेक्षा जास्त पुस्तकं त्यावर उपलब्ध होतील, अशी आशाही मूर्ती यांनी व्यक्त केली.

**मेक्सिको निवडणूक**

मेक्सिकोच्या अध्यक्षीय निवडणुकीत क्लाउडिया शेईनबाऊम यांनी ऐतिहासिक विजय मिळवला असून देशाच्या अध्यक्षपदी निवड झालेल्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत. मेक्सिकोच्या राष्ट्रीय निवडणूक संस्थेनं सत्ताधारी मोरेना पक्षाच्या शेईनबाऊम निवडणुकीत विजयी झाल्याची अधिकृत घोषणा केली आहे. 61 वर्षीय शेईनबाऊम मेक्सिको सिटीच्या माजी महापौर असून त्यांना या निवडणुकीत 58 ते 60 टक्के मतं मिळाली आहेत.

**फळांचा-रस**

भारतीय अन्न सुरक्षितता आणि मानक प्राधिकरण अर्थात FSSAI नं सर्व खाद्यपदार्थ व्यावसायिकांना 100 टक्के फळांचा रस असल्याचा दावा करणारा किंवा प्रक्रिया केलेला फळांचा रस हा मुख्य घटक असल्याचा उल्लेख जाहिरातींमधून तत्काळ प्रभावाने काढून टाकण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच या उत्पादनांवर लावण्यासाठी अगोदरच छापण्यात आलेली सर्व लेबल्स 1 सप्टेंबर 2024 पूर्वी संपवून टाकावीत अशाही सूचना अन्नपदार्थ व्यावसायिकांना देण्यात आल्या आहेत. हे व्यावसायिक चुकीच्या पद्धतीनं पुनर्रचित केलेल्या विविध प्रकारच्या फळांच्या रसांची विक्री करत असल्याचं आढळल्यानं हे निर्देश देण्यात आले असल्याचं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**आरोग्य**

सर्व रुग्णालयांनी प्रमाणित नियमावलीचं आणि अग्निसुरक्षा नियमांचं काटेकोरपणे पालन करण्याच्या आवश्यकतेचा केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं पुनरुच्चार केला आहे. कोणत्याही रुग्णालयामध्ये रुग्ण, कर्मचारी आणि अभ्यागतांची सुरक्षा आणि हित याची काळजी घेणं अत्यंत महत्त्वाचं असल्याचं मंत्रालयानं अधोरेखित केलं आहे. अलीकडेच काही ठिकाणी रुग्णालयांमध्ये आगीच्या घटना घडल्या. या घटना विद्युत यंत्रणेची काळजीपूर्वक देखभाल न केल्यानं तसंच वातानुकूलन यंत्रं आणि इतर उपकरणांच्या वापरामुळं विजेच्या लाईन्सवर अतिरिक्त ताण येऊन शॉर्ट सर्किटमुळे झाल्या असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. मंत्रालयानं अलीकडेच या संदर्भात राज्यं आणि केंद्रशासित प्रदेश आणि सुमारे 390 आरोग्य सेवा संस्थांसोबत बैठक घेतली होती.

**धनखड**

सनदी अधिकाऱ्यांनी कायमच पक्षपाती दृष्टिकोनाच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची गरज उप-राष्ट्रपती जगदीप धनखड यांनी स्पष्ट केली. सनदी अधिकाऱ्यांना राजकीय दृष्टिकोन ठेवून कामकाज हाताळता येऊ शकत नाही असं, धनखड यांनी नवी दिल्ली इथं आयएएसच्या 2022 तुकडीतील सहाय्यक सचिवांना संबोधित करताना अधोरेखित केलं. भारतीय नोकरशाही सक्षम आणि कार्यक्षम असल्याचं मान्य करत, त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना राष्ट्रीय, संघराज्यवादी दृष्टीकोन बाळगण्याचं आणि कायम देशहिताला प्राधान्य देण्याचं आवाहन केलं.

**पंतप्रधान**

21 व्या शतकातील जग भारताकडे अनेक अपेक्षांनी पाहात असून भारताचे प्रशासन जगभरातील अनेक देशांसाठी उदाहरण बनलं आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मोदी यांनी एका पत्राद्वारे देशातील लोकांसमोर आपले विचार मांडले आहेत. भारताच्या लोक-समर्थक सुशासन, आकांक्षी जिल्हे आणि आकांक्षी विभाग यांसारख्या नाविन्यपूर्ण पद्धतींची आज जागतिक स्तरावर चर्चा होत आहे. अवघ्या दहा वर्षांत 25 कोटी लोकांना गरिबीतून वर येण्यासाठी सक्षम करणे ही अभूतपूर्व गोष्ट असल्याचं मोदी यांनी या पत्रात म्हटलं आहे. त्याचबरोबर गरिबांना सक्षम बनवण्यापासून ते शेवटच्या स्तरापर्यंत पोहोचण्यापर्यंतच्या सरकारच्या प्रयत्नांनी समाजातील शेवटच्या टप्प्यावर उभ्या असलेल्या व्यक्तींना प्राधान्य देऊन जगाला प्रेरणा दिली असल्याचंही मोदी यांनी म्हटलं आहे. कन्याकुमारीहून दिल्लीला परत येताना मोदी यांनी हे विचार व्यक्त केले आहेत.

**क्रिकेट**

वीस षटकांच्या आयसीसी विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेने श्रीलंकेचा सहा गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेचा डाव केवळ 77 धावांत आटोपला. मात्र दक्षिण आफ्रिकेलादेखील हे छोटं आव्हान पार करताना मोठा

संघर्ष करावा लागला. ॲनरिक नॉर्टजेने चार षटकांत फक्त सात धावा देऊन चार बळी घेतले. तर, केशव महाराज आणि कागिसो रबाडा यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. नॉर्टजेला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.

**क्रिकेट-धावतंवर्णन**

अमेरिका आणि वेस्टइंडिजमध्ये होत असलेल्या आयसीसीच्या 20 षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील सामन्यांचं थेट समालोचन आकाशवाणीवरून प्रसारित केलं जाणार आहे. या प्रसारणामध्ये भारताचे सर्व सामने तसंच बाद फेरी, उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीचा समावेश असेल. थेट समालोचनाव्यतिरिक्त, सामना सुरू होण्यापूर्वी, डावाच्या विश्रांतीदरम्यान आणि सामना संपल्यानंतर विशेष संवादात्मक द्विभाषिक कार्यक्रम देखील प्रसारित केला जाणार आहे.

**सिंगापूर-बॅडमिंटन**

सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत लक्ष्य सेन, एच.एस. प्रणॉय, किदाम्बी श्रीकांत, प्रियांशू राजावत आणि किरण जॉर्ज यासारखे अव्वल भारतीय खेळाडू पुरुष एकेरीचे सामने खेळतील. मिश्र दुहेरीत एन. सिक्की रेड्डी आणि बी.सुमीत रेड्डी ही जोडी आणि महिला दुहेरीत ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद ही जोडीही मैदानात उतरणार आहे.

**आसाम पूर**

आसाममध्ये पूरस्थिती कायम आहे. 10 जिल्ह्यांतील 6 लाखांहून अधिक लोक पुराच्या तडाख्यात अडकले आहेत. गेल्या 24 तासांत कचार जिल्ह्यात चार जणांना आपला जीव गमवावा लागला असून या पुरामुळे मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या 18 वर पोहोचली आहे

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.